दिन विशेष...

१५६४ : जगप्रसिध्द नाटककार शेक्सपिअरचा जन्म याच दिवशी झाला.

१८७६ : आधुनिक काळातील एक महान संत गाडगे महाराज यांचा जन्मदिन.

१८८७ : रिव्हेरा येथे या दिवशी भूकंप.

१९०८ : फिरत्या दवाखान्याची कल्पना सर्वप्रथम मांडणाऱ्या जोहानेस एसमार्ग यांचा मृत्यू झाला.

# शौर्य मराठी

महाराष्ट्राचे निडर दैनिक

RNI-MAHMAR/2023/89125

सेन्सेक्स ८२,८१४.७१ +३१६.५७ (०.३८%)
डॉलर ₹ ९०.७३

आजचे तापमान (डिग्री सेल्सिअस)

| | कमाल | किमान |
|---|---|---|
| जळगाव | ३५ | १६ |
| दिल्ली | २९ | १५ |
| मुंबई | ३४ | २२ |
| नागपूर | ३३ | २० |
| पुणे | ३३ | १६ |

epaper.shauryamarathi.com | जळगाव, धुळे, नंदुरबार | सोमवार, दि. २३ फेब्रुवारी २०२६ | वर्ष २ रे | अंक १०४ | किंमत : ५ रु. | पाने ४


## सुविचार

जीवनातील प्रत्येक क्षण हा एक अनमोल रत्न आहे; तो जपून ठेवा.

सूर्योदय - सूर्यास्त
स.-६:५३ संध्या-६:३०

## सोने - चांदी

सोने(१० ग्रॅम) - चांदी (प्रति किलो)
१,६१,४३५/- २,७५,०००/-

## केळी भाव

नवती : १३५५ ते १३६०
पिल बाग : ११०१ ते ११०२
कांदे बाग : ----

# आपण एआयच्या मदतीने प्राचीन ग्रंथ, ज्ञान कसे जतन करत आहोत हे पाहून जागतिक नेते आश्चर्यचकित : पंतप्रधान

## इंडिया 'एआय' इम्पॅक्ट परिषद मोलाची ठरल्याची 'मन की बात'च्या १३१ व्या भागात कबुली

वृत्तसंस्था । नवी दिल्ली




**इंडिया एआय इम्पॅक्ट शिखर परिषद देशासाठी मौल्यवान ठरली आहे. ही परिषद उर्वरीत जगासाठीही महत्त्वपूर्ण ठरली. आपण एआयच्या मदतीने प्राचीन ग्रंथ आणि ज्ञान कसे जतन करत आहोत हे पाहून जागतिक नेते आश्चर्यचकित झाले.**

एआय इम्पॅक्ट शिखर परिषदेतील जागतिक नेते प्राण्यांवर उपचार करण्यात आणि शेतकऱ्यांना २४ तास मदत करण्यात एआयने केलेल्या अभूतपूर्व प्रगतीने प्रभावित झाले, असे प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आकाशवाणीवरील लोकप्रिय कार्यक्रम मन की बातच्या १३१ व्या भागात केली.

मोदी म्हणाले की, २३ फेब्रुवारी रोजी राष्ट्रपती भवनात राजाजी उत्सव साजरा केला जाईल. देश गुलामगिरीच्या प्रतीकांच्या पलीकडे गेला आहे आणि भारतीय संस्कृतीशी संबंधित गोष्टींना महत्त्व देऊ लागला आहे. राष्ट्रपती भवनाने देखील या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल उचलले आहे.

या प्रसंगी राष्ट्रपती भवनाच्या मध्यवर्ती प्रांगणात सी. राजगोपालाचारी यांच्या पुतळ्याचे अनावरण केले जाईल. ते स्वतंत्र भारताचे पहिले गव्हर्नर जनरल होते. सत्तेला पद म्हणून नव्हे तर सेवा म्हणून पाहणाऱ्यांपैकी ते होते. त्यांचे आचरण, आत्मसंयम आणि सार्वजनिक जीवनात स्वतंत्र विचार आजही आपल्याला प्रेरणा देत आहेत.

मोदी म्हणाले की, केरळमधील भरतप्पुझा नदीच्या काठावर, तिरुनावाया येथे शतकानुशतके जुनी परंपरा आहे. बरेच लोक याला महा माघ महोत्सव किंवा केरळ कुंभ असेही म्हणतात. माघ महिन्यात पवित्र नदीत स्नान करणे आणि त्या क्षणाला आयुष्यभरासाठी अमिट आठवण बनवणे हा त्याचा आत्मा आहे.

कालांतराने ही परंपरा क्षीण होत चालली आहे. जवळजवळ अडीचशे वर्षांपासून हा कार्यक्रम पूर्वीसारख्या भव्यतेने साजरा केला जात नव्हता. परंतु आज, आपल्या देशात, जो आपला वारसा पुन्हा ओळखत आहे, इतिहासाने आणखी एक वळण घेतले आहे. मोदी म्हणाले की, महा कुंभ असो किंवा केरळ कुंभ, हा केवळ स्नानाचा उत्सव नाही. तो स्मृती जागृत करण्याचा उत्सव आहे. तो संस्कृतीचा पुनर्जन्म आहे. उत्तरेकडून दक्षिणेकडे, नद्या वेगवेगळ्या असू शकतात, किनारे वेगवेगळे असू शकतात, परंतु श्रद्धेचा प्रवाह एकच आहे आणि हा भारत आहे.

### ➤ अलिन शेरीन अब्राहमचाही उल्लेख

मोदींनी केरळमधील निर्दोष अलिन शेरीन अब्राहमचाही उल्लेख केला. ते म्हणाले, काही दिवसांपूर्वीच आपण केरळमधील अलिन शेरीन अब्राहम या निष्पाप मुलीला गमावले. ती अवघ्या १० महिन्यांची असतानाच निधन पावली. तिच्यापुढे एक संपूर्ण आयुष्य होते, जे अचानक संपले. इतकी स्वप्ने आणि आनंद अपूर्ण राहिले. तिच्या पालकांना ज्या वेदना होत असतील त्या शब्दात व्यक्त करता येणार नाहीत. इतक्या तीव्र वेदनांमध्येही, अलिनचे वडील अरुण अब्राहम आणि आई शेरीन यांनी असा निर्णय घेतला जो प्रत्येक नागरिकाच्या हृदयात आदर भरून जातो. त्यांनी अलिनचे अवयव दान करण्याचा निर्णय घेतला. हा एकच निर्णय त्यांच्या विचारसरणीचा आणि त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा किती व्यापकपणा दर्शवितो.

### खाकीचे स्वप्न अन् बेरोजगारीचे विदारक वास्तव

# नाशिकमध्ये ३८० जागांसाठी ९७ हजारांहून अधिक अर्ज दाखल



वृत्तसंस्था । नशिक

**सदरक्षणाय खलनिग्रहणाय... ब्रीदवाक्य डोळ्यासमोर ठेवत खाकी वर्दीचे स्वप्न प्रत्यक्षात उतरवण्यासाठी ९६ हजारांहून अधिक अर्ज नाशिक ग्रामीण दलाकडे प्राप्त झाले. विशेष म्हणजे पोलीस शिपाई, पोलीस शिपाई चालक आणि कारागृह विभागातील एका पदासाठी राज्याच्या कानाकोपऱ्यातून पदवीधर, उच्च पदवीधर विद्यार्थ्यांनी यामध्ये अर्ज दिले आहे. अभियांत्रिकी, वैद्यकीय, तांत्रिक असे उच्च शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांचाही या मध्ये समावेश आहे.**

नाशिक ग्रामीण पोलीस दलातील रिक्त पदांसाठी भरती प्रक्रियेला शनिवार पासुन सुरूवात झाली. या भरती प्रक्रियेत पोलीस शिपाई कर्मचारी पदासाठी २१० जागा, चालक पोलीस शिपाई पदासाठी ५२, आणि कारागृह पोलीस पदासाठी ११८ जागांचा समावेश आहे. एकुण ३८० जागांसाठी ९७ हजार अर्ज प्राप्त झाले असून हे उमेदवार दिवसरात्र एक करत खाकी वर्दीचे स्वप्न प्रत्यक्षात येण्यासाठी प्रयत्न करत आहे.

भरती प्रक्रियेत पारदर्शकता येण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केला जात आहे. अर्जाची संख्या (पान २ वर)

भरती प्रक्रिया पारदर्शक पध्दतीने राबवण्यात येत आहे. उमेदवारांनी कोणत्याही भुलथापांना बळी पडू नये. उमेदवाराची निवड त्याच्या गुणवत्तेवर होणार आहे. काही शंका असल्यास वरिष्ठ अधिकाऱ्यांशी संपर्क साधावा, मात्र चुकीच्या मार्गाचा अवलंब करू नये. अनेक उच्च शिक्षीत तरूणांनीही या पदासाठी अर्ज केले आहे.

**- बाळासाहेब पाटील**
जिल्हा पोलीस अधीक्षक; नाशिक


## थोडक्यात

### हार्दिक पंड्याने पहिल्या पत्नीला गिफ्ट दिली महागडी कार

**मुंबई ।** टीम इंडियाचा अष्टपैलू खेळाडू हार्दिक पंड्या सध्या टी-२० विश्वचषक २०२६ मध्ये खेळत आहे. विश्वचषकाबरोबरच हार्दिक त्याच्या खाजगी आयुष्यातील घडामोडींमुळे चर्चेत आहे. हार्दिकने पहिली पत्नी नताशा स्टँकोविक व मुलगा अगस्त्य पंड्याला एक खास हाय-एंड लँड रोव्हर डिफेंडर कार भेट दिली आहे. ज्याचे फोटो व्हायरल होत आहेत. या कारची किंमत ३ ते ४ कोटी रुपये इतकी आहे.

### ठाकरे बंधूंच्या युतीत मिठाचा खडा?

**मुंबई ।** महानगरपालिकेच्या निवडणुकीच्या निमित्ताने राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांची युती अवघ्या राज्याने पाहिली. शिवसेनेला राम राम ठोकून राज ठाकरेंनी स्वतःचा मनसे पक्ष स्थापन केल्यापासून या दोन्ही बंधूंनी एकत्र यायला हवं अशी अपेक्षा सामान्य जनता व्यक्त करत होती. मात्र, दोन्ही नेत्यांमधील राजकीय वाद शिगेला पोहोचला होता. दरम्यान, लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीला दोन्ही पक्षांना आलेल्या अपयशामुळे दोन्ही पक्षांनी मराठीच्या मुद्द्यावरून मुंबई महापालिका निवडणुकीच्या निमित्ताने युती केली. याच युतीबाबत आता संजय राऊतांना प्रश्न विचारण्यात आला. त्यावर त्यांनी उत्तर देणं टाळलं.



### उन्हाळ्याची चाहूल लागताच लिंबू शंभरी पार !

**जळगाव ।** जिल्ह्यात फेब्रुवारी अखेरपासून तापमानात बऱ्यापैकी वाढ झाली आहे. अशा स्थितीत किरकोळ बाजारात लिंबू चांगलेच भाव खाताना दिसत आहेत.लिंबाची आवक घटत असताना सरबत विक्रेत्यांसह रसवंती गृहे, हॉटेल व्यवसायिक तसेच घरगुती ग्राहकांकडून मागणी वाढल्याने लिंबू किरकोळ बाजारात शंभरीपार गेला आहे. कृषी उत्पन्न बाजार समितीच्या फळे व भाजीपाला उपबाजारात सध्या लिंबाची दैनंदिन सरासरी आवक केवळ पाच ते सहा क्विंटलपर्यंत मर्यादित आहे. मागील आठवड्याच्या तुलनेत ही आवक कमी असल्याचे व्यापाऱ्यांनी सांगितले. परिणामी घाऊक बाजारात दर्जानुसार लिंबाला किमान ८,००० रुपये, कमाल १०,००० रुपये तर सरासरी ९,००० रुपये प्रति क्विंटल असा भाव मिळत आहे.

## जनतेची साथ हीच यशाची खरी ताकद, सुनेत्रा पवारांची शरद पवारांसाठी खास पोस्ट!

वृत्तसंस्था । मुंबई

**ज्येष्ठ नेते आणि राज्यसभेचे खासदार शरद पवार यांची संसदीय कारकिर्द आज ६० व्या वर्षात पदार्पण करत आहे. या काळात शरद पवारांनी देशाच्या आणि राज्याच्या राजकारणातले चढउतार पाहिले. त्यानिमित्ताने राज्याच्या उपमुख्यमंत्री आणि शरद पवारांच्या सून सुनेत्रा पवार यांनी त्यांच्यासाठी खास पोस्ट लिहिली आहे.**



'आदरणीय शरद पवार साहेबांच्या सार्वजनिक व संसदीय जीवनाला आज ६० वर्षांचा ऐतिहासिक टप्पा पूर्ण होत आहे. १९६७ मध्ये सुरू झालेला त्यांचा जनसेवेचा प्रवास आजही तितक्याच ऊर्जेने आणि निष्ठेने पुढे जात आहे. महाराष्ट्र विधानसभेपासून ते संसद भवनापर्यंत विविध जबाबदाऱ्या समर्थपणे सांभाळत त्यांनी लोकप्रतिनिधी म्हणून सातत्याने जनतेचा विश्वास संपादन केला आहे.

या दीर्घ वाटचालीत त्यांच्यासोबत खंबीरपणे उभे राहिलेले कार्यकर्ते, सहकारी आणि सर्वात महत्त्वाची म्हणजे जनतेची साथ, हीच त्यांच्या यशाची खरी ताकद आहे. पवार साहेबांचे मार्गदर्शन आणि प्रेरणा आगामी काळातही सर्वांना नवी ऊर्जा देत राहो, हीच सदिच्छा', असं सुनेत्रा पवार म्हणाल्या.

## आदिवासी विकासमंत्र्यांची शिष्टाई, बिऱ्हाड आंदोलन स्थगित

वृत्तसंस्था । नाशिक



**आदिवासी विकास विभागाच्या आश्रमशाळेत खासगी कंपनीमार्फत कंत्राटी भरतीविरोधात वर्ग तीन व वर्ग चारच्या कर्मचाऱ्यांकडून आदिवासी आयुक्तालयासमोर सलग पाच महिने आंदोलन करूनही मागण्या मान्य न झाल्याने आदिवासी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी संघटनेच्यावतीने रविवारी पुन्हा आदिवासी आयुक्तालयासमोर बिऱ्हाड आंदोलनाचा इशारा देण्यात आला होता.**

मात्र शनिवारी नाशिक दौऱ्यावर असणाऱ्या (पान २ वर)

रोजंदारी कर्मचाऱ्यांनी २१ मे २०२५ चा शासन निर्णय रदद करावा अशी मागणी केली आहे. शासकीय आश्रमशाळेत पाच लाख विद्यार्थी शिक्षण घेतात. त्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळावे अशी या शिक्षकांची भूमिका आहे. वर्ग तीनच्या भरतीबाबत सकारात्मक चर्चा झाली आहे. याबाबत सहानुभूतीपूर्वक विचार करू तसेच इतर मागण्यांसंदर्भात २३ तारखेला बैठक घेऊन तोडगा काढण्यात येईल. त्यामुळे आंदोलन स्थगित करण्याचा निर्णय शिष्टमंडळाने घेतला आहे.

**- अशोक उईके**
(आदिवासी विकासमंत्री)

### ➤ आंदोलन स्थगितमुळे प्रशासनाने घेतला मोकळा श्वास

नाशिक शहर परिसरात सध्या कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर ठिकठिकाणी रस्ता रुंदीकरण सह अन्य कामे सुरू आहे. या कामांमुळे शहर परिसरातील वाहतुक पर्यायी मार्गाने वळवण्यात आली आहे. मात्र या मुळे वाहतुकीचा खोळंबा होत असतांना शहराच्या मध्यवर्ती असलेल्या गडकरी चौक येथे बिऱ्हाड आंदोलन पुन्हा सुरू झाले तर गडकरी चौक ते सीबीएस मार्गावर एकेरी वाहतुक, या ठिकाणी असलेल्या शाळेत दहावीच्या परीक्षा सुरू आहेत, सरकारी कार्यालयांमध्ये येणाऱ्या जाणाऱ्यांना वेगवेगळ्या अडचणींचा सामना करावा लागला असता. या आंदोलनाची धास्ती प्रशासनाने घेतली. याबाबत पोलीस आयुक्तालयात बैठकही झाली. मात्र आदिवासी मंत्र्यासोबत झालेल्या बैठकीनंतर आंदोलन स्थगित चा निर्णय झाला आणि सर्वांनी सुटकेचा श्वास घेतला.

# भारतीय महिला संघाने आशिया चषक रायझिंग स्टार्स स्पर्धेचं पटकावल जेतेपद

## फायनलमध्ये बांगलादेशला नमवलं

वृत्तसंस्था । बँकॉक

**राधा यादवच्या नेतृत्त्वाखाली भारताच्या अ महिला संघाने महिला आशिया चषक रायझिंग स्टार्स २०२६ स्पर्धेचं जेतेपद आपल्या नावे केला. अंतिम सामन्यात टीम इंडियाने बांगलादेश अ संघाचा पराभव करत ४६ धावांनी सामना आपल्या नावे केला. टीम इंडियाने सांघिक कामगिरीच्या बळावर या स्पर्धेचं जेतेपद आपल्या नावे केलं. कर्णधार राधा यादवने संपूर्ण स्पर्धेत संघाचं उत्तम नेतृत्त्व करत जेतेपददेखील पटकावलं आहे.**




बँकॉकमध्ये झालेल्या या सामन्यात टीम इंडियाने प्रथम फलंदाजी करताना तेजल हसबनीस व राधा यादव यांच्या भागीदारीच्या बळावर १३४ धावांचा डोंगर उभारला. तर प्रत्युत्तरात टीम इंडियाच्या कमालीच्या गोलंदाजीच्या बळावर बांगलादेश अ संघाला अवघ्या ८८ धावांवर सर्वबाद करत २०व्या षटकात विजय मिळवला. स्पर्धेतील पहिल्याच सामन्यात युएईविरूद्ध पराभूत झाल्यानंतर टीम इंडियाने या स्पर्धेत मागे वळून न पाहता थेट जेतेपद पटकावलं आहे. भारताने दिलेल्या १३५ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना बागंलादेश संघालाही टीम इंडियाने धक्के दिले. साईमा ठाकोर व प्रेमा रावत यांनी उत्कृष्ट गोलंदाजी केली. शमिमा सुल्ताना हिने २० धावांचं योगदान दिलं. कोणतीच फलंदाज २० धावाही करू शकली नाही. भारताच्या गोलंदाजांनी पुन्हा एकदा उत्कृष्ट कामगिरी केली. या सामन्यात प्रेमा रावतने ३ विकेट्स घेतल्या. तर सोनिया मेंदिया व तनुजा कंवर यांनी २-२ विकेट्स तर सायमा ठाकोर, मिन्नू मणी व कर्णधार राधा यादव यांनी प्रत्येकी १-१ विकेट्स घेतल्या. यासह बांगलादेशचा संघ ८८ धावांवर सर्वबाद करत स्पर्धेचं जेतेपद पटकावलं.

**भारत अ संघाने या सामन्याची नाणेफेक जिंकत प्रथम फलंदाजीचा निर्णय घेतला. यादरम्यान टीम इंडियाची सुरूवात फारशी चांगली झाली नाही. ४४ धावांत संघाने ४ विकेट्स गमावल्या होत्या. यानंतर तेजल हसबनीस व कर्णधार राधा यादव यांनी ५० चेंडूत ६९ धावांची भागीदारी रचली. जी सामन्याचा टर्निंग पॉईंट ठरली. तेजल हसबनीसने ३४ चेंडूत ३ चौकार व २ षटकारांसह ५१ धावांची खेळी केली. तर राधा यादवने ३० चेंडूत ३ चौकार व एका षटकारासह ३६ धावांची खेळी केली. याशिवाय वृंदा दिनेशने १९ धावांचं योहगान दिलं. तर इतर फलंदाजांनी जेमतेम धावा केल्या. यासह टीम इंडियाने २० षटकांत ७ बाद १३४ धावसंख्या उभारली. यादरम्यान बांगलादेश अ संघाची कर्णधार फहिमा खातून हिने ४ विकेट्स घेतल्या.**

### इम्प्लांट सुरक्षिततेसाठी आयआयटी मद्रासचे नवे तंत्र!

वृत्तसंस्था । मुंबई

शरीरात बसविण्यात येणाऱ्या वैद्यकीय इम्प्लांटची सुरक्षितता अधिक प्रभावीपणे तपासण्यासाठी आयआयटी मद्रास येथील संशोधकांनी रक्त गोठण्याचा अचूक कालावधी मोजणारे नवे तंत्रज्ञान विकसित केले आहे. वैद्यकीय उपकरण निर्मिती क्षेत्रासाठी हे संशोधन महत्त्वपूर्ण मानले जात आहे. हृदयातील स्टेंट, कृत्रिम सांधे, कॅथेटर तसेच रक्तवाहिन्यांमध्ये वापरली जाणारी विविध इम्प्लांट उपकरणे शरीरात बसवल्यानंतर रक्त गुठळ्या तयार होण्याचा धोका असतो. अशा गुठळ्यांमुळे हृदयविकाराचा झटका, स्ट्रोक किंवा इम्प्लांट निकामी होण्याची शक्यता वाढते. त्यामुळे इम्प्लांटच्या पृष्ठभागाशी रक्ताची प्रतिक्रिया कशी होते, याची अचूक तपासणी करणे अत्यावश्यक असते.

## संपादकीय

### सरकारचे टोचले कान

राज्य सरकारने गरिबांना मदत करणे समजण्यासारखे आहे. पण आज अनेक राज्यांना महसुलातील तूट भेडसावत आहे. अशा परिस्थितीत मोफत देणे कितपत योग्य आहे? असे म्हणून सर्वोच्च न्यायालयाने सरकारचे कान टोचले आहे. गुरुवारी सर्वोच्च न्यायालयाने एक अतिशय महत्त्वाचा प्रश्न उपस्थित केला. सर्वोच्च न्यायालय म्हणाले सगळंच मोफत मिळाल्यास लोक काम करतील का? राजकीय पक्षं निवडणुकांच्या प्रचारादरम्यान 'मोफत गोष्टी देऊ' अशी मतदारांना आश्वासनं देतात. यात मोफत वीज, स्थानिक बसचा प्रवास, सायकली, कुकर-मिक्स वगैरे अनेक गोष्टींचा समावेश असतो. ही जर स्थिती कायम राहिली तर मग लोक कामच करणार नाही. एवढंच नव्हे तर सर्वोच्च न्यायालय पुढे असं म्हणाले की मोफत गोष्टी देण्याच्या योजनांमुळे देशाच्या आर्थिक विकासात अडथळे निर्माण होतात. म्हणूनच आता अशा योजनांचा फेरविचार करण्याची वेळ आली आहे. ही सर्वच निरीक्षणं महत्त्वाची आहेत. अलीकडे तमिळनाडूतील तामिळनाडू पॉवर डिस्ट्रीब्युशन कॉर्पोरेशन लिमिटेडने सर्वांना मोफत वीज देण्याचा प्रस्ताव तयार केला होता. याची सर्वोच्च न्यायालयाने दखल घेतली. सर्वोच्च न्यायालयाच्या तीन न्यायमूर्तींच्या खंडपीठाने ही निरीक्षणं मांडली. या खंडपीठात सरन्यायाधीश सूर्यकांत, न्या. जॉयमाल्ल्या बागची आणि न्या. विपुल पांचोली होते. खंडपीठ पुढे असेही म्हणाले की, राज्यांनी गरिबांना मदत करणे समजण्यासारखे आहे. मात्र जर राज्यांना महसुलात तूट येत असेल तर अशा गोष्टी मोफत देणे कितपत योग्य आहे? आज भारतीय संघराज्यातील अनेक राज्यांना महसुलातील तूट भेडसावत आहे.भारतीय इतिहास पुस्तके सर्वोच्च न्यायालयाच्या खंडपीठाची निरीक्षणं व्यवस्थित समजून घेणे गरजेचे आहे. न्यायालयाने 'तमिळनाडू पॉवर डिस्ट्रीब्युशन'कडे विचारणा केली की ज्या ग्राहकांना बील देणे शक्य आहे आणि ज्या ग्राहकांना बील देणे शक्य नाही, असे वर्गीकरण न करता तुम्ही सरसकट सर्वांना मोफत वीज कशी काय देता? सर्वोच्च न्यायालयाचा हा प्रश्न व्यवस्थित समजून घेतला पाहिजे. सर्वोच्च न्यायालय गरिबांना मदत करू नका, असं म्हणत नाही. पण सर्वांना सरसकट मोफत वीज द्यायला आक्षेप घेत आहे. कल्याणकारी समाजवादी सरकारने गोरगरिबांना मदत केलीच पाहिजे. याबद्दल कोणाचाच आक्षेप नाही. पण सर्वांना नाही. हाच मुद्दा काही वर्षांपूर्वी राज्य सरकारने बारावीपर्यंतचे शिक्षण मुलींसाठी मोफत केलं होतं, तेव्हासुद्धा अभ्यासकांनी असेच आक्षेप नोंदवले होते. ज्या पालकांची ऐपत आहे त्यांनी फी द्यावी. ज्यांची नाही, त्यांनी या सरकारी योजनेचा लाभ घ्यावा. हे योग्य आहे. पण लोकप्रियतेची आणि मतांची हाव सुटलेल्या सरकारांना कोणी सांगावं? आणि सर्वोच्च न्यायालयासारख्या सोनाराने काच टोचले, हे बरं झालं. तसं पाहिलं तर अशाप्रकारे अनेक गोष्टी आणि सेवा मोफत देण्याचे प्रकार गेली अनेक वर्षे सुखेनैव सुरू आहेत. भारतीय राजकारणाचा आज हे प्रकार अविभाज्य भाग झालेले आहेत. पक्ष कोणताही असो, राज्य कोणतेही असो; अशाप्रकारे नागरिकांना मोफत गोष्टी देण्याची सवय लागलेली आहे. याला कोणताचा पक्ष अपवाद नाही. अरविंद केजरीवालांचा 'आप'सुद्धा नाही. केजरीवाल यांनी काही वर्षांपूर्वी दिल्लीतील बसप्रवास महिलांसाठी मोफत केला होता. येथे पुन्हा तोच मुद्दा होता की ज्या महिला बसचं तिकीट काढू शकतात, त्यांना कशाला मोफत प्रवास? मात्र लोकप्रियतेला हपापलेले पक्ष, असा तार्किक विचार करू इच्छित नाही. सर्वोच्च न्यायालयाने आता नोंदवले आहे तसे की या सगळ्यांचा बोझा करदात्यांवर पडतो. हे सर्व पैसे करदात्यांच्या खिशातून दिले जातात. अर्थात, यामागे निवडणुका जिंकण्याचे राजकारण आहे हे उघडे गुपित आहे. नोव्हेंबर २०२४ मध्ये झालेला महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुका शिंदेसेना आणि भाजपाने दणक्यात जिंकल्या. त्यामागे 'लाडकी बहीण' योजना होती, हे एव्हाना मान्य झालेले आहे. ही योजना शिंदे सरकारने जुलै २०२४ मध्ये लागू केली होती. आता आपल्या देशातील अनेक राज्य सरकारं अशा योजना जाहीर करत असतात.राजकीय विषयांवरील पुस्तके येथे जागतिक पातळीवर झालेले बदल समजून घेतले पाहिजे. यातून आपल्याला शासन यंत्रणेच्या जबाबदाऱ्यांत आमूलाग्र बदल झालेले दिसून येतील. आधुनिक पूर्व काळात शासन व्यवस्थेची महत्त्वाची आणि कदाचित एकमेव जबाबदारी म्हणजे प्रजेचे रक्षण करणे. अंतर्गत सुरक्षेसाठी 'पोलीस' आणि बाह्यसुरक्षेसाठी 'सैन्य', अशी दोन दलं उभारली जात असत. त्यांच्या पगारासाठी आणि सरकारच्या इतर खर्चासाठी जनतेवर कर लादला जात असे. हा प्रकार अनेक शतकं चालला. काही अभ्यासकांच्या मते याला एकोणिसाव्या शतकात धक्के बसायला लागले. एवढेच नव्हे तर १९१७ मध्ये रशियात झालेल्या कामगार क्रांतीनंतर सत्तेवर आलेल्या कम्युनिस्ट पक्षाच्या सरकारने असंख्य लोकोपयोगी कामे करून, उपक्रम राबवून तसेच नोकरीचा 'मूलभूत हक्क' देऊन फार थोड्या काळात जनतेचे राहणीमान वाढवलं.

# धुळ्याहून मुंबई - पुण्यासाठी रोज रात्रीची रेल्वेसेवा सुरू करण्याची मागणी

## आ. अग्रवाल यांच्यातर्फे रेल्वे व्यवस्थापकांना निवेदन

प्रतिनिधी । धुळे

**येथून मुंबई व पुण्यासाठी रोज रात्री एसी व स्लीपर कोचसह रेल्वेसेवा तातडीने सुरू करावी, अशी मागणी शहराचे आमदार अनुप अग्रवाल यांनी केली आहे. या संदर्भात आ.अग्रवाल यांनी भारतीय मध्य रेल्वेचे भुसावळ येथील विभागीय व्यवस्थापक तसेच येथील स्टेशन मास्तरांना नुकतेच निवेदन दिले.**



आमदार अग्रवाल यांच्यातर्फे भारतीय जनता पक्षाचे जिल्हा महानगर उपाध्यक्ष अजय अग्रवाल, विजय वाघ, यशवंत येवलेकर, संदीप बैसाणे, ॲड. सचिन जाधव, गौतम गायकवाड यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, सद्यःस्थितीत धुळे येथून फक्त मुंबईसाठी दिवसातून एक वेळा रेल्वे जाते. तीही सकाळी ६.३० वाजेला धुळे येथून निघते. तर दुपारी १.३० वाजेला ती मुंबई येथे पोहोचते. तसेच मुंबईहून दुपारी १२ वाजेला निघणारी रेल्वे रात्री ८.३० वाजेला धुळे येथे पोहोचते. या व्यतिरिक्त अन्य कुठलीही रेल्वे सेवा नसल्याने प्रवाशांना विविध गैरसोयींचा सामना करावा लागत आहे.

तसेच प्रवाशांना अन्य पर्यायांचा अवलंब करावा लागत असल्याने त्यात त्यांच्या वेळेचा व पैशांचाही मोठा अपव्यय होत आहे. वास्तविक, धुळे शहर आता विकसित महानगर म्हणून उदयास येत आहे. धुळे शहर परिसरासह नरडाणा येथेही औद्योगिक विकासाला मोठी चालना मिळाली आहे.

वाढत्या औद्योगीकरणामुळे नवनवीन उद्योजक आपले उद्योग सुरू करत आहेत. या उद्योजकांसह अन्य व्यापारी, व्यावसायिक व जिल्ह्यातील अनेक नोकरदारांना कामानिमित्त मुंबईला ये-जा करावी लागते. मात्र, मुंबईसाठी रात्रीची रेल्वेसेवा नसल्याने प्रवाशांना विविध समस्यांचा व गैरसोयींचा सामना करावा लागत आहे.

या पार्श्वभूमीवर धुळे येथून मुंबईसाठी व मुंबईहून धुळ्यासाठी रात्रीची एसी व स्लीपर कोचसह रेल्वेसेवा सुरू करावी, जेणेकरून प्रवाशांची मोठी सोय होईल, अशी मागणी अग्रवाल यांनी केली आहे. दरम्यान, धुळे, नंदुरबार शहरांसह दोन्ही जिल्ह्यांतील हजारो विद्यार्थी, नोकरदार, व्यावसायिक पुणे येथे वास्तव्यास आहेत. त्यांच्यासह अन्य कामांसाठी रोज पुण्याकडे जाणाऱ्या प्रवाशांची संख्याही मोठी आहे.

मात्र, सद्यःस्थितीत धुळ्याहून थेट पुण्यासाठी कुठलीच रेल्वेसेवा सुरू नसल्याने प्रवाशांची मोठी गैरसोय होत आहे. यामुळे धुळ्याहून रोज रात्री पुण्यासाठी एसी व स्लीपर कोचसह तातडीने रेल्वेसेवा सुरू करण्याची गरज आहे.

या रेल्वेसेवेला प्रवाशांकडून अभूतपूर्व प्रतिसाद मिळणार असल्याने तातडीने धुळ्याहून पुण्यासाठी व पुण्याहून धुळ्यासाठी थेट रेल्वेसेवा सुरू करावी, अशी मागणीही आ. अग्रवाल यांनी निवेदनातून केली आहे.

### ➢ आ. केंद्रीय रेल्वेमंत्र्यांकडेही पाठपुरावा धुळ्याहून

मुंबई व पुण्यासाठी रोज रात्री रेल्वेसेवा सुरू करण्यासंदर्भात आ.अग्रवाल यांच्याकडून सतत पाठपुरावा सुरू आहे. यासंदर्भात आमदार अग्रवाल यांनी केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांना जानेवारी २०२५ मध्ये व त्यानंतर अनेकदा निवेदने देऊन पाठपुरावा सुरू ठेवला आहे. याशिवाय मध्य रेल्वेचे मुंबई येथील प्रमुख व्यवस्थापकांसोबत जानेवारी २०२५ मध्ये बैठक घेत धुळे ते मुंबई व धुळे ते पुणे या रेल्वेसेवांबाबत चर्चा करून मागणीही केली आहे. आता पुन्हा मध्य रेल्वेच्या भुसावळ येथील विभागीय व्यवस्थापकांना निवेदन देऊन रेल्वेसेवा सुरू करण्याची आग्रही मागणी केली आहे. ही रेल्वेसेवा लवकरच सुरू होईल, असा विश्वासही आ. अग्रवाल यांनी व्यक्त केला.

## पटेल फार्मसीत शैक्षणिक पदविका प्रमाणपत्र अभ्यासक्रम सुरू

प्रतिनिधी । शिरपूर

आर. सी. पटेल इन्स्टिट्यूट ऑफ फार्मासुटिकल एज्युकेशन ॲण्ड रिसर्च, शिरपूर महाविद्यालयात हर्बल एक्सट्रेक्शन टेक्निक्स अँड स्टॅन्डराईझेशन या शैक्षणिक पदविका प्रमाणपत्र अभ्यासक्रम शुभारंभ फार्माकोग्नोसी विभागातर्फे करण्यात आला. भारतात तसेच जगात औषधी वनस्पतीचे महत्त्व खूपच वाढले आहे व लोकांची पसंती देखील आहे. त्यासाठी आयुर्वेदिक वनस्पतीचा काढा व त्यामधील उत्पादने मार्केटमध्ये उपलब्ध करताना वनस्पतींचा एक्स्ट्रॅक्ट जास्त प्रमाणात लागतो. यासंदर्भात महत्त्वाची माहिती व देखरेख तसेच उपयोगिता विद्यार्थ्यांना कळावी म्हणून हा अभ्यासक्रम फार्माकोग्नोसी विभागाचे प्रमुख डॉ. ए. यु. टाटीया यांनी स्वतः तयार केला आहे. या शैक्षणिक पदविका प्रमाणपत्र अभ्यासक्रमाच्या शुभारंभात आर. सी. पटेल इन्स्टिट्यूट ऑफ फार्मासुटिकल एज्युकेशन अँड रिसर्च, शिरपूर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय सुराणा, आर. सी. पटेल इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसीचे प्राचार्य डॉ. नितिन हासवानी, उपप्राचार्य डॉ. अतुल शिरखेडकर आदी मान्यवर उपस्थित होते.

# माझी वसुंधरा अभियान, बोराडीच्या मुकुटात मानाचा तुरा

प्रतिनिधी । बोराडी

**येथील ग्रामपंचायतीच्या विकासाच्या वाटचालीत आज पुन्हा एकदा सुवर्णक्षणाची नोंद झाली आहे. आदिवासी बहुल भागातील हे छोटेसे गाव आपल्या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे राज्य आणि देशपातळीवर ओळख निर्माण करत आहे.**




माझी वसुंधरा अभियान ५.० अंतर्गत राज्यात द्वितीय क्रमांक पटकावत बोराडीच्या मुकुटात मानाचा आणखी एक तुरा रोवला गेला आहे. बोराडी ग्रामपंचायतीने गेल्या काही वर्षांत स्वच्छता, पर्यावरण संवर्धन, ग्रामविकास आणि प्रशासनातील पारदर्शकता यावर विशेष भर दिला. त्याचे माझी फलित म्हणून गावाला आजपर्यंत अनेक मानाचे पुरस्कार मिळाले आहेत. विभागस्तरीय निर्मल ग्राम पुरस्कार (२००७), जिल्हास्तरीय आर. आर. पाटील सुंदर ग्राम पुरस्कार (२०२०), विभागस्तरीय संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियान पुरस्कार (२०२२), राज्यस्तरीय प्रथम माझी वसुंधरा अभियान ३.० (२०२४), राज्यस्तरीय तृतीय माझी वसुंधरा अभियान ४.० (२०२४) आणि राज्यस्तरीय प्रथम राजीव गांधी गतिमान प्रशासन पुरस्कार (२०२५) अशा विविध सन्मानांनी बोराडीचा गौरव वाढविला आहे. या सातत्यपूर्ण कामगिरीमुळे गावाचे नाव राज्यात आणि देशात उज्ज्वल झाले आहे. याच परंपरेत यंदा माझी वसुंधरा अभियान ५.० मध्ये राज्यात द्वितीय क्रमांक मिळवत बोराडी ग्रामपंचायतीने १.२५ कोटी रुपयांचे बक्षीस प्राप्त केले. मुंबई येथे झालेल्या भव्य समारंभात महाराष्ट्र व गुजरात राज्याचे राज्यपाल आचार्य देवव्रत यांच्या हस्ते पुरस्कार वितरित करण्यात आले तर प्रमुख पाहुणे म्हणून उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर, कौशल्य रोजगार उद्योजकता मंत्री मंगलप्रभात लोढा, पर्यावरण व वातावरणीय बदल व पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे, माहिती व तंत्रज्ञान सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड आशिष शेलार, ग्रामविकास व पंचायतराज विभाग मंत्री जयकुमार गोरे, महापौर बृहन्मुंबई रितु तावडे, खासदार अरविंद सावंत, आ. सचिन अहिर, वि.प. सदस्य सुनिल शिंदे, आमदार आदित्य ठाकरे, सिध्देश्वर कदम, आदींनीही या यशात मोलाचा वाटा उचलला आहे.

## के. के. उर्दू हायस्कूलमध्ये मातृभाषा दिन साजरा

प्रतिनिधी । जळगाव

येथील के.के.उर्दू गर्ल्स हायस्कूलमध्ये दि. २१ रोजी अंतरराष्ट्रीय मातृभाषा दिवस साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात सिदरते मुनतहा यांच्या कुराण पठणाने झाली. यावेळी अध्यक्षस्थानी मुख्याध्यापिका तनवीर जहाँ शेख असून शिक्षिका नाज़ीया शेख, मुश्ताक भिस्ती, मोहसीन शाह, अरशीया शेख व वसीम सय्यद उपस्थित होते. मातृभाषा दिनानिमित्त माहिती देतांना मुख्याध्यापिका तनवीर जहाँ शेख यांनी उपस्थित विद्यार्थ्यांनींना सांगितले की मातृभाषेत शिक्षण घेतल्याने मानवाच्या सर्वगुण विकासाला चालना मिळते.

# अमळनेर येथे संशोधन पद्धतीवर कार्यशाळा

प्रतिनिधी । अमळनेर

**खानदेश शिक्षण मंडळ संचलित प्रताप महाविद्यालय, अमळनेर (स्वायत्त) येथील इतिहास विभाग, इतिहास संशोधन केंद्र व राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान (RUSA) यांच्या संयुक्त विद्यमाने प्रताप तत्त्वज्ञान केंद्रात मानव्य विद्याशाखेअंतर्गत समाजशास्त्रीय संशोधन पद्धती या विषयावर कार्यशाळा उत्साहात संपन्न झाली.**




कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रभारी प्राचार्य डॉ. हर्षवर्धन जाधव होते. प्रमुख अतिथी म्हणून माजी प्राचार्य डॉ. अरुण जैन उपस्थित होते. प्रमुख वक्त्या म्हणून लोकनायक बापूजी अणे महिला महाविद्यालय, यवतमाळ येथील इतिहास विभाग प्रमुख प्रा. डॉ. कविता राजेंद्र तातेड यांनी सखोल मार्गदर्शन केले. तसेच प्रा. डॉ. राधिका मोहन पाठक व प्रा. डॉ. रावसाहेब नेरकर यांची उपस्थिती लाभली.

प्रमुख वक्त्यांनी राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (NEP) अंतर्गत संशोधनाचे वाढते महत्त्व अधोरेखित करत संशोधन प्रक्रियेतील विविध टप्प्यांवर प्रकाश टाकला. संशोधन शीर्षक निवड, साहित्याचे पुनर्विलोकन, माहिती संकलन, विश्लेषण, वर्गीकरण, तक्ते तयार करणे, संदर्भ सूची, प्रबंध लेखन आदी मुद्द्यांवर त्यांनी पीपीटीच्या माध्यमातून सविस्तर मार्गदर्शन केले.

कार्यक्रमास RUSA, IQAC व NAAC समन्वयक, प्राध्यापक, संशोधक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रा. अवित पाटील यांनी केले, तर आभार प्रदर्शन प्रा. प्रियंका चावडा यांनी केले. संशोधन क्षेत्रातील बारकावे समजून घेण्यासाठी ही कार्यशाळा अत्यंत उपयुक्त ठरल्याची प्रतिक्रिया उपस्थितांनी व्यक्त केली.

## पान १ वरुन

### नाशिकमध्ये ३८० जागांसाठी ......

पाहता दररोज मैदानी चाचणीसाठी तीन हजार उमेदवारांना बोलावण्यात येत आहे. यामध्ये १६०० मीटर धावणे, १०० मीटर धावणे, गोळाफेक अशा तीन प्रकारात चाचण्या होत आहे. धावण्याच्या चाचणीसाठी आरएफआयडी चिपचा वापर केला जात असून गोळाफेक चाचणीही मॅन्युअली पार पडत आहे. उमेदवारांला काही आक्षेप असल्यास तात्काळ अपील करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. अखेरच्या टप्पात महिला उमेदवारांसाठी चाचणीचे नियोजन करण्यात आले आहे. दरम्यान, मैदानी चाचण्यांसाठी येणाऱ्या उमेदवारांची गैरसोय टाळण्यासाठी पोलीस दलाच्या वतीने निवासाची तसेच त्यांच्या अल्पोहारासाठी दोन केळी, बिस्कीटे, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था केली आहे.

याशिवाय काही अडचण उद्भवल्यास वैद्यकीय पथक तैनात करण्यात आले आहे नाशिक ग्रामीण पोलीस दलात वेगवेगळ्या पदासाठी अर्ज केलेल्या उमेदवारांमध्ये पदवीधर, उच्चपदवीधरांचा समावेश आहे. यातील काहींनी विज्ञान तसेच अन्य तांत्रिक शाखांमध्ये शिक्षण पुर्ण केले. मैदानी चाचणीच्या माध्यमातून या सगळ्यांना खाकी वर्दी अंगावर चढवायची आहे. यासाठी मागील कित्येक महिन्यांपासून त्यांचा सराव सुरू आहे. मात्र रिक्त पदांची संख्या आणि आलेले अर्ज यामुळे बेरोजगारीचे विदारक चित्र ठळकपणे समोर येत आहे.

### आदिवासी विकासमंत्र्यांची......

आदिवासी विकासमंत्री अशोक उईके यांची आंदोलकांच्या शिष्ट मंडळाने भेट घेतली. चर्चेअंती हे आंदोलन तात्पुरते स्थगित करण्यात आल्याने प्रशासनाने सुटकेचा नि:श्वास सोडला आहे. आदिवासी विकास विभागाने रोजंदारी तत्वावरील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या जागी कंत्राटी भरतीसंदर्भात २१ मे २०२५ रोजी आदेश काढले. बाहय स्त्रोतांव्दारे भरती करण्यास आदिवासी रोजंदारी शिक्षकांनी कडाडून विरोध दर्शवला.

ही बाहयस्त्रोत भरती प्रक्रिया रदद करावी या मागणीसाठी गतवर्षी जुलैला आदिवासी आयुक्तालयासमोर बिऱ्हाड आंदोलन सुरू करण्यात आले होते. चर्चेच्या अनेक फेऱ्या झाल्यानंतर तब्बल १५० दिवसानंतर आंदोलन स्थगित करण्यात आले होते. रोजंदारीवरील कर्मचाऱ्यांना सेवेत कायम करावे यासह विविध मागण्यांसाठी संघटनेने रविवारपासून पुन्हा आदिवासी आयुक्तालयासमोर बिऱ्हाड आंदोलन सुरू करण्याचे जाहीर केले होते. त्यामुळे प्रशासनाची चांगलीच धांदल उडाली. शनिवारी आदिवासी विकास मंत्री अशोक उईके यांनी आंदोलक शिष्टमंडळाची जिल्हाधिकारी कार्यालयात बैठक घेतली.

या चर्चेअंती २३ फेब्रुवारी रोजी मुंबई येथे मंत्री उईके यांच्या उपस्थितीत बैठक होईल. त्यावर मागण्यांविषयी सकारात्मक चर्चा होणार असल्याने आंदोलन स्थगित करण्यात आले.

# कास्ट्राईब कर्मचारी महासंघातर्फे छत्रपती शिवाजी महाराजांना अभिवादन!

प्रतिनिधी । जळगाव

**हिंदवी स्वराज्य संस्थापक, कुळवाडी भूषण, रयतेसाठी झटणारे राजे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती निमित्त कास्ट्राईब कर्मचारी महासंघ, जळगावच्यावतीने त्यांना अभिवादन करण्यात आले.**



या प्रसंगी कास्ट्राईब कर्मचारी महासंघाचे नाशिक विभागीय अध्यक्ष रविंद्र तायडे, जिल्हाध्यक्ष पुलकेशी केदार, कास्ट्राईब शिक्षक संघटनेचे जिल्हाध्यक्ष बापू साळुंके, सचिव राजीव वानखेडे, तालुकाध्यक्ष नितीन सोनवणे, राहुल मोरे, गोपिचंद भालेराव, कास्ट्राईब मनपाचे कार्याध्यक्ष नंदकुमार गायकवाड, डी. एच. भास्कर, प्रा. डॉ. अशोक हनुवते, महसूलचे भास्कर घुले आदी उपस्थित होते.

## अश्वती पाटीलची सुवर्ण कामगिरी, तीन सुवर्ण व बेस्ट ॲथलेटिक्सचा बहुमान

प्रतिनिधी । कापडणे

धुळे येथे नुकतीच सब-ज्युनिअर ॲथलेटिक्स अजिंक्यपद स्पर्धा २०२६ नुकतीच पार पडली. यात धुळे येथील अवघ्या सात वर्षाच्या अश्वती कृष्णा पाटील हिने एकाच वेळी तीन सुवर्णपदके पटकावून 'बेस्ट ॲथलेटिक्स'चा बहुमान मिळवला. या यशाबद्दल अश्वतीवर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. पोदार इंटरनॅशनल स्कूलमध्ये पहिलीच्या वर्गात शिकणाऱ्या अश्वतीने आठ वर्षाखालील वयोगटात आपली चमक दाखवली. या स्पर्धेत सहभागी होत तिने १०० मीटर धावणे, तसेच ५० मीटर धावणे, यात प्रथम क्रमांक मिळवित दोन्ही स्पर्धामध्ये सुवर्णपदक पटकावले. तसेच ब्रॉड जम्प स्पर्धेतही प्रथम क्रमांक मिळवित सुवर्ण पदकावर आपले नाव कोरले. अश्वती कृष्णा पाटील हिला एकाच वेळी तीन सुवर्णपदके तसेच 'बेस्ट ॲथलेटिक्स' पुरस्काराचा करंडकही बहाल करण्यात आला आहे.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादक - सागर काशिनाथ ओतारी **(मोबा.- ९९७००५३०६६)** व मालक रेखाबाई काशिनाथ ओतारी यांनी श्री समर्थ कृपा डिजिटल प्रिंटर्स, पी -३३, औद्योगिक वसाहत शॉपिंग कॉम्प्लेक्स, जुनी एमआयडीसी, जळगाव -४२५००१ येथे छापून शॉप नं. ई-१२, चौथा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव- ४२५००१ (महाराष्ट्र), येथे प्रसिद्ध केले.
**✲ कार्यकारी संपादक - किशोर शंकर शिंपी** (✲ पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील) (RNI-MAHMAR/2023/89125) कार्यालय दूरध्वनी क्र. : ०२५७-२२२४०६६, E-Mail : shauryamarathi@gmail.com

# काम पारदर्शक अन् वेळेत पूर्ण करण्याच्या महापौरांच्या प्रशासनाला सूचना

## शिवतीर्थ परिसरातील गटार कामाची प्रत्यक्ष पाहणी

प्रतिनिधी । जळगाव

**शहरातील शिवतीर्थ आणि सैनिकी वसतिगृह परिसरातील सांडपाण्याचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी जळगाव शहर महानगरपालिकेने तातडीने पावले उचलली आहेत. या भागातील जुनी भूमिगत गटार लाईन अपुरी पडत असल्याने, त्याठिकाणी मोठी पाईपलाईन टाकण्याच्या कामाची महापौर दीपमाला काळे आणि नगरसेविका ॲड. शुचिता हाडा यांनी आज प्रत्यक्ष घटनास्थळी जाऊन पाहणी केली.**



शिवतीर्थ परिसरातील वाढती लोकसंख्या आणि सांडपाण्याचं प्रमाण पाहता, येथील जुनी भूमिगत गटार व्यवस्था छोटी पडत होती. यामुळे अनेकदा सांडपाणी तुंबण्याचे किंवा दुर्गंधीचे प्रकार घडत होते. ही समस्या लक्षात घेऊन महापौरांनी येथे मोठी गटार लाईन टाकण्याचे निर्देश दिले होते.

या कामाला शनिवारी सकाळी १० वाजेपासून प्रत्यक्ष सुरुवात करण्यात आली आहे. पाहणीदरम्यान महापौर दीपमाला काळे यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांशी चर्चा करून कामाचा आराखडा समजून घेतला. त्यांनी स्पष्ट केले की, गटारीचे काम दर्जेदार आणि पारदर्शक पद्धतीनेच झाले पाहिजे. नागरिकांना होणारा त्रास लक्षात घेता, हे काम लवकरात लवकर पूर्ण करावे.

पाईपलाईन टाकताना वाहतुकीला किंवा नागरिकांना अडथळा निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. यावेळी नगरसेविका ॲड. शुचिता हाडा यांनीही कामाच्या तांत्रिक बाबींवर अधिकाऱ्यांचे लक्ष वेधले.

स्थानिक नागरिकांच्या अडचणी लक्षात घेऊन नियोजनबद्ध पद्धतीने काम पूर्ण करण्याची अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. या नवीन गटार लाईनमुळे परिसरातील स्वच्छता सुधारण्यास मोठी मदत होणार आहे. भविष्यातील नागरी गरजा लक्षात घेऊन सक्षम पायाभूत सुविधा उभारण्यावर भर दिला जात असून नगरसेविका ॲड. शुचिता हाडा यांनी देखील कामांमध्ये येणाऱ्या विविध अडचणींबाबत अधिकाऱ्यांचे लक्ष वेधले.

## थोडक्यात

### पाटणकर शाळेत शिवजयंती उत्साहात

**जळगाव ।** शिवाजी नगर परिसरातील कै. इंदिराबाई पाटणकर नवीन मराठी शाळेत शिवजयंती मोठ्या उत्साहात व पारंपरिक पद्धतीने साजरी करण्यात आली. कार्यक्रमास मुख्याध्यापक कैलास तायडे, शिक्षक वर्ग, कर्मचारी वर्ग, विद्यार्थी, विद्यार्थ्यांचे पालक तसेच एसएमसी सदस्य उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराज आणि राजमाता जिजाऊ यांच्या प्रतिमेच्या पूजनाने करण्यात आली. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यानंतर विद्यार्थ्यांनी विविध सांस्कृतिक उपक्रम सादर करून उपस्थितांची मने जिंकली. शिवजयंती निमित्त मिरवणूक काढण्यात आली.

### समीक्षा पवार, तेजस वाघोदे यांची पंतप्रधान रॅलीसाठी निवड

**भुसावळ ।** येथील कला, विज्ञान आणि पु.ओ. नाहाटा वाणिज्य महाविद्यालयातील एनसीसी कॅडेट्स जे.यू.ओ. समिक्षा पवार आणि जे.यू.ओ. तेजस वाघोदे यांची दिल्ली येथे झालेल्या प्रजासत्ताक दिन शिबिर (आरडीसी) अंतर्गत पंतप्रधान रॅलीसाठी निवड झाल्याने त्यांचा गौरव करण्यात आला. ११ वर्षांनंतर महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांना हा मान मिळाल्याने परिसरात अभिमानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

दोन्ही विद्यार्थ्यांनी भुसावळपासून सुरू झालेला खडतर प्रवास विविध कॅम्पमधील कठोर निवड प्रक्रियेत यशस्वीरीत्या पूर्ण करत दिल्लीपर्यंत मजल मारली. विशेष म्हणजे समिक्षा पवार हिने महाराष्ट्र ट्रूपची कॉन्टिजंट कमांडर म्हणून जबाबदारी सांभाळत महाविद्यालयाचा विशेष गौरव वाढविला.

## वाईन शॉप फोडणारा सराईत गुन्हेगार १२ तासांत जेरबंद

प्रतिनिधी । जळगाव

**शहरात एकाच रात्री दोन वाईन शॉप फोडून लाखोंची रोकड लंपास करणाऱ्या सराईत चोरट्याला स्थानिक गुन्हे शाखेने अवघ्या १२ तासांत जेरबंद करत मोठी कामगिरी बजावली आहे. तांत्रिक आणि गोपनीय माहितीच्या आधारे तपासाची चक्रे वेगाने फिरवत पोलिसांनी आरोपीला जेरबंद केले आहे. त्याच्याकडून मुद्देमालासह गुन्ह्यात वापरलेली मोटारसायकल जप्त करण्यात आली आहे.**



जिल्हापेठ पोलीस स्टेशन हद्दीतील भजे गल्ली येथे दि. १९ फेब्रुवारी रोजी रात्री असलेल्या 'प्रिन्स वाईन शॉप'चे शटर तोडून अज्ञात चोरट्याने कपाटातील सुमारे २ लाख ५० हजार रुपयांची रोकड चोरून नेली होती. त्याच रात्री एमआयडीसी पोलीस स्टेशन हद्दीतील अजिंठा चौफुली परिसरातील 'राज वाईन्स'चे शटर तोडून सुमारे १ लाख २५ हजार रुपये चोरून नेण्यात आले होते. याप्रकरणी जिल्हापेठ पोलीस ठाण्यात व एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात आला आहे.

एकाच रात्री दोन ठिकाणी झालेल्या घरफोड्यांमुळे गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलीस अधीक्षक डॉ. महेश्वर रेड्डी यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राहुल गायकवाड व त्यांच्या पथकाने तपासाची सूत्रे हाती घेतली. तांत्रिक विश्लेषण, सीसीटीव्ही फुटेज आणि गोपनीय माहितीच्या आधारे संशयिताचा माग काढण्यात आला. अवघ्या १२ तासांत रामनिवास मंजू गुप्ता (वय ३७, रा. रामनगर, कल्याण, जि. ठाणे) याला ताब्यात घेण्यात आले. आरोपीकडून सुमारे ३ लाख ४ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. गुन्ह्यात वापरलेली बजाज ॲव्हेंजर मोटारसायकलही पोलिसांनी जप्त केली आहे. चौकशीत आरोपीने दोन्ही वाईन शॉपमध्ये चोरी केल्याची कबुली दिली आहे. तो मूळचा उत्तर प्रदेश येथील रहिवासी असून मुंबई, नवी मुंबई, ठाणे, मिरा-भाईंदर तसेच पुणे शहरातील विविध पोलीस ठाण्यांमध्ये त्याच्यावर घरफोडीचे गुन्हे दाखल असल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. सानपाडा, नेरुळ, नालासोपारा, कोरेगाव पार्क यांसह विविध ठिकाणी त्याच्याविरुद्ध गुन्हे नोंद आहेत. या कारवाईत पोलीस उपनिरीक्षक शरद बागल, सहाय्यक फौजदार अतुल वंजारी, पोलीस हेड कॉन्स्टेबल विजय पाटील, नितीन बाविस्कर, अक्रम शेख, उमाकांत पाटील, किशोर पाटील, रवींद्र कापडणे, प्रशांत परदेशी तसेच नेत्रम विभागातील मुबारक देशमुख आदींचा सहभाग होता.

जिल्हापेठ पोलीस ठाण्याकडील गुन्ह्याचा पुढील तपास पो.उपनिरीक्षक गोपाल देशमुख तर एमआयडीसी पोलीस ठाण्याकडील गुन्ह्याचा तपास पोहेकॉ भगवान चौधरी करीत आहेत.

## डॉ. वर्षा पाटील महाविद्यालयात तेजस्विता २०२६ उत्साहात प्रारंभ!

प्रतिनिधी । जळगाव

**डॉ. वर्षा पाटील कॉलेज ऑफ कॉम्पुटर एप्लीकेशन महाविद्यालयात तेजस्विता २०२६ कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.**



तेजस्विता २०२६ चे उद्घाटन डॉ.उल्हास पाटील विधी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा.डॉ. नयना झोपे यांच्या हस्ते नारळ फोडून करण्यात आले. यावेळी महाविद्यालयाच्या प्रिन्सिपल डॉ. नीलिमा वारके देखील उपस्थित होत्या. मान्यवरांनी विद्यार्थ्यांना खेळाचे महत्व व सांस्कृतिक कार्यक्रमातील सहभाग याबद्दल मार्गदर्शन केले. २० फेब्रुवारी ते २५ फेब्रुवारीपर्यंत चालणाऱ्या या वार्षिक स्नेहसंमेलनात तेजस्विता २०२६ अंतर्गत प्रोफेशनल डे (स्पोर्ट्स डे) मिस मॅच डे अँड किड्स डे, रांगोळी, चॉकलेट डे, मेहंदी, ट्रॅडिशनल डे, प्रेस कॉन्फरन्स ,सोशल ऍक्टिव्हिटी, कल्चरल डे, डान्स, सिंगिंग, ड्रामा ई. स्पर्धा व कार्यक्रम घेण्यात येणार आहे. कार्यक्रमाचे नियोजन प्रा. ऋतुजा नारखेडे यांच्या मार्गदर्शनाने होत आहे.

## माजी खा. डॉ.उल्हास पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त ६६ मोतिबिंदू रुग्णांची तपासणी व शस्त्रक्रिया

गोदावरी फॉउंडेशनचे अध्यक्ष तथा माजी खा. डॉ.उल्हास पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त खान्देश व विदर्भात नेत्र व शारीरिक तपासणी शिबिरातून आरोग्याचा जागर केला जाणार आहे.

डॉ.उल्हास पाटील वैद्यकिय महाविद्यालय व रुग्णालयाचे तज्ञ डॉक्टर दि २२ ते २८ फेब्रुवारीपर्यंत खान्देशातील विविध गावात जावून नागरिकांची नेत्र व शारीरिक तपासणी करणार आहे. यातील ज्या रूग्णांना शस्त्रक्रियेची गरज असेल असे रूग्ण शोधून त्यांच्यावर ताबडतोब महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजनेंतर्गत आवश्यक त्या कागदपत्रांची पुर्तता करून शस्त्रक्रिया करण्यात येणार आहे. यासाठी तज्ञांच्या टीमला आरोग्य मित्र व गोदावरी कॉलेज ऑफ नर्सिंगच्या कर्मचारी सहकार्य करणार आहे. तसेच रूग्णालयाच्या नेत्र विभागाने ६६ नेत्र रूग्णांची तपासणी व शस्त्रक्रियेचा मानस व्यक्त केला आहे. दि.२३ रोजी वाढदिवसानिमित्त या रुग्णांशी माजी खा.डॉ.उल्हास पाटील शस्त्रक्रियेनंतर संवाद साधणार आहेत. तरी जास्तीत जास्त नागरिकांनी या आरोग्याच्या जागरमध्ये सहभागी होवून तपासणी करून घ्यावी, असे आवाहन रुग्णालय प्रशासनाने केला आहे.

## जळगाव येथे सुरू असलेल्या पोलीस शिपाई भरतीचा शारीरिक चाचणी अहवाल जाहीर

प्रतिनिधी । जळगाव

**येथे जिल्हा पोलीस दलाच्या आस्थापनेवरील पोलीस शिपाई संवर्गातील रिक्त १७१ पदांच्या भरती प्रक्रियेला वेग आला आहे. महिला उमेदवारांची शारीरिक मोजमाप व मैदानी चाचणी परीक्षा दि. ११ फेब्रुवारीपासून सुरू करण्यात आली आहे.**



दि.२१ फेब्रुवारी रोजी पार पडलेल्या चाचणीचा संक्षिप्त अहवाल पुढीलप्रमाणे पोलीस शिपाई (एकूण रिक्त पदे - १७१) शारीरिक चाचणीसाठी बोलावलेले उमेदवार: १५०० (महिला) प्रत्यक्ष हजर उमेदवार: १२८०; शारीरिक मोजमापात अपात्र: १४६ मैदानी चाचणीत अपात्र: ६०२ मैदानी चाचणीत पात्र ठरलेले उमेदवार: ५३२ सदर भरती प्रक्रिया अत्यंत पारदर्शक पद्धतीने व काटेकोर नियोजनानुसार राबविण्यात येत आहे. ही प्रक्रिया पोलीस अधीक्षक डॉ. महेश्वर रेड्डी यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडत आहे.

आजच्या चाचणीसाठी उमेदवारांना सकाळी ५ वाजल्यापासून प्रवेश देण्यात आला होता. उमेदवारांनी शिस्तबद्ध पद्धतीने सहभाग नोंदविला. भरती प्रक्रियेतील पुढील टप्प्यांबाबतची माहिती अधिकृत सूचनांद्वारे कळविण्यात येणार असून, उमेदवारांनी वेळोवेळी दिलेल्या सूचनांचे पालन करावे, असे आवाहन पोलीस प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.

## तरुणांनी चिकित्सक दृष्टीकोन विकसित करण्याची गरज : प्रा. शरद बाविस्कर




प्रतिनिधी । जळगाव

**बदलत्या जागतिक परिस्थितीत तरुणाईसमोर उभ्या ठाकलेल्या आव्हानांचा सखोल ऊहापोह करत लेखक व तत्त्वज्ञान अभ्यासक प्रा. शरद बाविस्कर यांनी जळगाव येथे प्रभावी व्याख्यान दिले. प्रा. शेखर सोनाळकर बौद्धिक व्यासपीठ, जळगावतर्फे आयोजित या कार्यक्रमात राज्यस्तरीय महाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धा २०२६ च्या विजेत्यांचा गौरवही करण्यात आला.**

प्रा. शेखर सोनाळकर बौद्धिक व्यासपीठाच्या वतीने 'बदलता जागतिक अवकाश व तरुणाईपुढील आव्हाने' या विषयावर आयोजित व्याख्यानमालेत प्रा. शरद बाविस्कर यांनी सध्याच्या जागतिक राजकीय, सामाजिक व आर्थिक बदलांचा तरुणांच्या विचार विश्वावर होणारा परिणाम स्पष्ट केला. त्यांनी ज्ञान, तंत्रज्ञान, जागतिकीकरण आणि मूल्यव्यवस्थेतील बदल यांच्या पार्श्वभूमीवर तरुणांनी चिकित्सक दृष्टीकोन विकसित करण्याची गरज अधोरेखित केली. बदलत्या अवकाशात स्वतःची ओळख जपत सामाजिक बांधिलकी जोपासणे हे आजच्या पिढीसमोरील मोठे आव्हान असल्याचे त्यांनी नमूद केले. आपल्या भाषणात त्यांनी जागतिक पातळीवरील संघर्ष, पर्यावरणीय संकटे, डिजिटल माध्यमांचा प्रभाव आणि रोजगाराच्या बदलत्या संधी यांचा वेध घेतला.

तरुणांनी केवळ करिअर केंद्री विचार न करता सामाजिक भान जपले पाहिजे, असे सांगत त्यांनी विचारमंथनात्मक भूमिका मांडली. संवाद, विवेकबुद्धी आणि वैज्ञानिक दृष्टीकोन यांच्या आधारेच तरुणाई सक्षम होऊ शकते, असेही ते म्हणाले. या कार्यक्रमात राज्यस्तरीय महाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धा २०२६ च्या विजेत्यांना मान्यवरांच्या हस्ते पारितोषिके प्रदान करण्यात आली. विद्यार्थ्यांच्या वक्तृत्वकौशल्याचा गौरव करत उपस्थितांनी ांचे अभिनंदन केले. तरुणांमध्ये विचारप्रवृत्त वातावरण निर्माण करण्यासाठी अशा स्पर्धा व व्याख्यानमालेचे आयोजन महत्त्वाचे असल्याचे मत मान्यवरांनी व्यक्त केले.

व्यासपीठावर वासंती दिघे, प्रा. सत्यजित साळवे, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे माजी कुलगुरू के. बी. पाटील, प्रा. राजू पवार, खलील देशमुख, प्रा. यशवंत सैंदाणे यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुश्मिता भालेराव यांनी केले. व्याख्यानाला नागरिकांची व विद्यार्थ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती लाभली.

## लेवा पाटीदार समाजाच्या सामूहिक सोहळ्यात १९ जोडपी विवाहबंधनात

### पारंपरिक विधी, मान्यवरांची उपस्थिती आणि नवदांपत्यांना संसारोपयोगी भेटवस्तूंचे वितरण

प्रतिनिधी । जळगाव

**अखिल भारतीय लेवा पाटीदार युवक महासंघ यांच्या वतीने लेवा पाटीदार समाजाचा भव्य सामूहिक विवाह सोहळा दि. २२ फेब्रुवारी रोजी मिराई लॉन, जळगाव येथे उत्साहपूर्ण व पारंपरिक वातावरणात संपन्न झाला. या सोहळ्यात एकूण १९ वधू-वरांनी विवाहबंधनात अडकत नव्या आयुष्याची सुरुवात केली.**



कार्यक्रमाची सुरुवात मंगलाष्टक व वेदघोषाने झाली. पारंपरिक पद्धतीने सजवलेल्या १० बैलगाड्यांमधून विवाहविधी दिमाखात पार पडले. वधू-वरांचा मिरवणुकीतून झालेला प्रवेश, शिस्तबद्ध आयोजन आणि धार्मिक वातावरण यामुळे संपूर्ण परिसरात आनंद व उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. समाजबांधव, नातेवाईक व विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या उपस्थितीत सोहळा अत्यंत भव्य स्वरूपात पार पडला.

कार्यक्रमास खासदार रक्षा खडसे, जळगावच्या महापौर दीपमाला काळे, आमदार राजू भोळे, भरत महाराज गादीपती, धनंजय चौधरी, गायत्री भंगाळे नगराध्यक्ष, रेखा पाटील, सीमा भोळे माजी महापौर, शैलेजा नारखेडे उपनगराध्यक्ष भुसावळ, योगेश पाटील, सिंधुताई कोल्हे, जयश्री महाजन माजी महापौर, लालचंद पाटील माजी जि प अध्यक्ष, यावल गटनेत्या मंदा महाजन , ललित भैय्या चौधरी वि. हिं. प. महामंत्री, मनीषा खडके, पियुष कोल्हे, पो.पा.प्रभाकर पाटील, तुषार महाजन गव्हर्मेंट कॉन्ट्रॅक्टर, चंदन अत्तरदे, उद्योजक, मिलिंद चौधरी सरपंच भादली, गायत्री राणे , प्रवीण कोल्हे नगरसेवक आदी मान्यवरांची व्यासपीठावर उपस्थिती लाभली. उपस्थितांनी नवदांपत्यांना शुभाशीर्वाद देत त्यांच्या उज्ज्वल भवितव्यासाठी शुभेच्छा व्यक्त केल्या. या प्रसंगी नवदांपत्यांना विविध भेटवस्तूंचे वितरण करण्यात आले.

# जळगाव जिल्ह्याची केळी 'एआय'च्या बळावर घेणार आता 'ग्लोबल' भरारी..!

## कृषी विभागाने 'एआय'च्या मदतीने 'निर्यातक्षम केळी उत्पादन करण्याचा घेतला निर्णय

प्रतिनिधी । जळगाव

**देशात सर्वाधिक केळी लागवड करणारा जिल्हा अशी ओळख असलेल्या जिल्ह्यात आता नवी तांत्रिक क्रांती घडविण्याची तयारी सुरू झाली आहे. उत्पादनात अव्वल असतानाही निर्यातीच्या स्पर्धेत जिल्हा मागे राहिल्याची नोंद घेत जिल्हा परिषदेच्या कृषी विभागाने एआयच्या मदतीने 'निर्यातक्षम केळी उत्पादन प्रात्यक्षिके' ही महत्त्वाकांक्षी योजना राबविण्याचा निर्णय घेतला आहे. सेस निधीतून ही योजना साकारली जाणार असून केळी उत्पादक शेतकऱ्यांसाठी ती दिशादर्शक ठरेल.**



जळगाव जिल्ह्यात दरवर्षी ५० हजार हेक्टरपेक्षा अधिक क्षेत्रावर केळीची लागवड होत असल्याने स्थानिक अर्थव्यवस्थेचा मोठा भाग या पिकावर अवलंबून आहे. मात्र, निर्यातक्षम दर्जासह ग्रेडिंग, पॅकिंग व तांत्रिक मानकांमध्ये सातत्य नसल्याने निर्यातीच्या बाबतीत सोलापूर जिल्ह्याने आघाडी घेतली आहे. ही तफावत कमी करून जळगावला जागतिक बाजारपेठेत सक्षमपणे उभे करण्यासाठी 'एआय' आधारित प्रिसिजन फार्मिंगचा अवलंब करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मिनल करनवाल आणि अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी रणधीर सोमवंशी यांच्या संकल्पनेतून ही योजना आकारास आली आहे. या योजनेत कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) आणि डेटा ॲनालिटिक्सच्या साहाय्याने पिक व्यवस्थापन करण्यात येणार आहे. शेतात सेन्सरद्वारे मृदातील आर्द्रता, तापमान, आर्द्रता व हवामानाचा डेटा संकलित केला जाईल. या डेटावर आधारित अचूक सिंचन व खत व्यवस्थापनाचे नियोजन होईल.

तज्ज्ञांचे मार्गदर्शन आणि प्रात्यक्षिके

योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी बारामती आणि जळगाव येथील कृषी विज्ञान केंद्रातील तज्ज्ञांचे मार्गदर्शन घेण्यात येणार आहे. निवडक शेतांवर प्रात्यक्षिके राबवून शेतकऱ्यांना प्रत्यक्ष अनुभव दिला जाईल. यामध्ये शेतकऱ्यांसाठी कार्यशाळा, प्रशिक्षण सत्रे, तांत्रिक सल्ला व नियमित फॉलोअप यांचा समावेश असेल. एआय प्रणालीद्वारे तयार होणारे अहवाल शेतकऱ्यांना मोबाईल ॲप किंवा संदेशाद्वारे उपलब्ध करून देण्याचाही विचार आहे. या योजनेमुळे उत्पादनातील अनिश्चितता कमी होऊन गुणवत्तेत सुधारणा होईल. निर्यात निकषांनुसार फळांचा आकार, रंग, वजन व साठवण क्षमता सुधारण्यास मदत होईल. परिणामी, आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत जळगावच्या केळीला अधिक मागणी निर्माण होऊन शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढण्याची अपेक्षा आहे. केळी उत्पादनात दर्जात्मक सातत्य आणणे, निर्यात निकषांनुसार उत्पादन प्रक्रिया विकसित करणे, उत्पादन खर्चात बचत करून शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविणे, हवामान बदलाच्या पार्श्वभूमीवर जोखमीचे व्यवस्थापन, हा योजनेचा मुख्य उद्देश आहे.

### योजनेंतर्गत प्रमुख घटक

- स्वयंचलित हवामानावर आधारित सिंचन वेळापत्रक
- मृदा तपासणी अहवालानुसार संतुलित खत व्यवस्थापन
- ठिबक सिंचन व फर्टिगेशन प्रणाली
- उच्च दर्जाच्या टिश्यूकल्चर केळी रोपांची लागवड
- हिरवळीच्या खतांचा वापर करून मृदा सुपीकता वाढविणे
- मल्चिंगद्वारे ओलावा संवर्धन
- बड इंजेक्टर तंत्रज्ञानाद्वारे किड नियंत्रण
- सूक्ष्म अन्नद्रव्यांची फर्टिगेशनमधून पूर्तता
- बंच स्प्रे व स्कर्ट बॅगचा वापर करून दर्जा संरक्षण

### जागतिक बाजारपेठेत पाय रोवणार

मुख्य कार्यकारी अधिकारी मिनल करनवाल यांनी सांगितले, की जळगाव जिल्हा परिषदेच्या अधिकृत लोगोमध्ये केळीचा समावेश आहे. यावरून जिल्ह्याची ओळख या पिकाशी किती घट्ट जोडलेली आहे हे स्पष्ट होते. या पार्श्वभूमीवर केळी उत्पादनात तांत्रिक आधुनिकीकरण करून जागतिक दर्जा मिळविणे हा जिल्हा परिषदेचा दीर्घकालीन दृष्टीकोन आहे. केळी उत्पादनात जळगाव अग्रेसर आहे. आता या उत्पादनाला जागतिक बाजारपेठेत स्पर्धात्मक बनविण्यासाठी एआय आणि प्रिसिजन फार्मिंगची जोड देणे आवश्यक आहे. शेतकऱ्यांना आधुनिक तंत्रज्ञान प्रत्यक्ष शेतात वापरण्याची संधी देऊन निर्यातक्षम, दर्जेदार व प्रमाणबद्ध उत्पादन साध्य करणे हा आमचा उद्देश आहे. स्मार्ट शेती, अचूक तंत्रज्ञान आणि तज्ज्ञ मार्गदर्शन यांच्या एकत्रित प्रयत्नातून जळगाव जिल्हा केवळ उत्पादनातच नव्हे, तर निर्यातक्षम केळी उत्पादनातही राज्यात आणि देशात आघाडी घेण्याच्या दिशेने पाऊल टाकत आहे. एआयच्या साहाय्याने जळगावची केळी आता जागतिक बाजारपेठेत नवे स्थान मिळविण्यास सज्ज झाली आहे.

## थोडक्यात

### रायसोनी महाविद्यालयाचे प्रा. रफिक शेख राष्ट्रीय पुरस्काराने सन्मानित

**जळगाव** । जी. एच. रायसोनी महाविद्यालयातील प्रा. रफिक जमील शेख यांना मएमिनेंट फिगर इन कॉम्प्युटर ॲप्लिकेशन्स अँड एज्युकेशनल ॲडमिनिस्ट्रेशन २०२६फ या मानाच्या राष्ट्रीय पुरस्काराने गौरविण्यात आले. इन्साईट्स सक्सेस आयोजित नॅशनल प्रेस्टिज अवॉर्ड्स २०२६ सोहळ्यात त्यांना हा सन्मान प्रदान करण्यात आला. हा भव्य पुरस्कार सोहळा रॅडिसन ब्लू, नवी दिल्ली येथे उत्साहात पार पडला. कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून प्रसिद्ध बॉलिवूड अभिनेते तुषार कपूर उपस्थित होते. त्यांच्या हस्ते प्रा. शेख यांना सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्र प्रदान करण्यात आले.

### बालविश्व शाळेत वार्षिक क्रीडा दिन जल्लोषात

**जळगाव** । बालविश्व इंग्लिश मीडियम स्कूल व बालविश्व प्राथमिक शाळेत वार्षिक क्रीडा दिन शिस्तबद्ध वातावरणात साजरा करण्यात आला. शिक्षणासोबतच शारीरिक तंदुरुस्ती आणि खेळातून व्यक्तिमत्व विकास साधण्याचा संदेश या महोत्सवातून देण्यात आला. दिमाखदार संचलन आणि सलामी कार्यक्रमाची सुरुवात विद्यार्थ्यांच्या अत्यंत शिस्तबद्ध अशा मार्च-पास्टने झाली. आकर्षक वेशभूषेत आणि तालावर पाऊल टाकत विद्यार्थ्यांनी मान्यवरांना सलामी दिली.

## कासार गल्ली–कालिका मंदिर परिसरातील दिवाबत्ती व पाईपलाईन प्रश्न मार्गी

प्रतिनिधी । धरणगाव



**शहरातील विकासकामांत आघाडीवर असलेले नगरसेवक सुनील चौधरी यांनी पुन्हा एकदा तत्परतेचा आदर्श घालून दिला आहे. प्रभाग क्रमांक ८ मधील रस्त्यावर पाईपलाईन लिकेज होऊन मोठ्या प्रमाणात पाण्याची नासाडी होत असल्याचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल होताच त्यांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली.**

परिस्थितीची पाहणी करून चौधरी यांनी स्वखर्चाने प्लंबर बोलावून पाईपलाईनची दुरुस्ती करून घेतली. लिकेजमुळे रस्त्याची झालेली दुरवस्था लक्षात घेऊन त्यांनी संबंधित भागाचे काँक्रिटीकरणही स्वखर्चाने केले. त्यामुळे पाण्याची नासाडी थांबली असून दूषित पाणीपुरवठ्याचा धोका टळला आहे. नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने ही कारवाई महत्त्वाची ठरली आहे. दरम्यान, कासार गल्ली व कालिका मंदिर परिसरात अनेक वर्षांपासून बंद असलेले दिवाबत्तीचे प्रश्नही त्यांनी मार्गी लावले. अंधारामुळे नागरिकांना भेडसावणारी गैरसोय व सुरक्षेची समस्या लक्षात घेऊन संबंधित विभागाशी समन्वय साधत परिसरातील दिवे सुरू करण्यात आले. तक्रारीची तत्काळ दखल घेऊन प्रत्यक्ष कृती करणारा नगरसेवक आम्ही प्रथमच पाहिला, अशा भावना नागरिकांनी व्यक्त केल्या. चौधरी यांच्या कार्यशैलीमुळे प्रभागातील विकासकामांना सकारात्मक चालना मिळत असल्याचे चित्र दिसून येत आहे.

## चोपडा नगरपरिषदेत अत्याधुनिक स्वच्छता मशिनरीचे लोकार्पण

### आ. प्रा. चंद्रकांत सोनवणे यांच्या हस्ते सोहळा उत्साहात; 'स्वच्छ चोपडा सुंदर चोपडा'चा संकल्प दृढ





प्रतिनिधी । जळगाव

**शहराच्या स्वच्छतेला आधुनिकतेची जोड देत चोपडा नगरपरिषद मार्फत खरेदी करण्यात आलेल्या अत्याधुनिक स्वच्छता मशिनरीचे लोकार्पण मा. आमदार प्रा. चंद्रकांत सोनवणे यांच्या शुभहस्ते उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाले.**

स्वच्छ भारत अभियानांतर्गत राबविण्यात आलेल्या या उपक्रमामुळे शहरातील स्वच्छता व्यवस्थापन अधिक सक्षम व परिणामकारक होणार आहे. कार्यक्रमास मा. नगराध्यक्षा नम्रता पाटील, उपनगराध्यक्ष पंकज बोरोले, सर्व सभापती, नगरसेवक-नगरसेविका, मुख्याधिकारी, विभागप्रमुख तसेच अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. नवीन मशिनरीमुळे रस्ते सफाई, नालेसफाई, कचरा संकलन व वाहतूक, तसेच सार्वजनिक ठिकाणांची स्वच्छता अधिक जलद, सुरक्षित आणि कार्यक्षम पद्धतीने करता येणार आहे. शहरातील वाढती लोकसंख्या व वाढणाऱ्या कचऱ्याच्या प्रमाणाचा विचार करता ही मशिनरी अत्यंत उपयुक्त ठरणार असल्याचे सांगण्यात आले. मनुष्यबळावरील ताण कमी होऊन कामकाजाची गुणवत्ता वाढणार आहे. आ.प्रा. सोनवणे यांनी आपल्या भाषणात नगरपरिषदेच्या प्रयत्नांचे कौतुक करत, स्वच्छ शहर हीच खरी प्रगतीची ओळख आहे. स्वच्छता ही केवळ प्रशासनाची नव्हे, तर प्रत्येक नागरिकाची सामूहिक जबाबदारी आहे, असे मत व्यक्त केले. नगराध्यक्षा सौ. पाटील यांनी नागरिकांनी ओला व सुका कचरा वेगळा करून स्वच्छतेत सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन केले.

## 'खाटू श्याम' जाणाऱ्या विशेष गाडीचे धरणगावात जल्लोषात स्वागत

प्रतिनिधी । धरणगाव

**काकीनाडा–हिसार विशेष एक्सप्रेस गाडीचे धरणगाव रेल्वे स्थानकावर मोठ्या उत्साहात स्वागत करण्यात आले. खाटू श्यामजी दर्शनासाठी जाणाऱ्या भाविकांसाठी ही गाडी सुरू झाल्याने शहर व परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.**



स्वागत समारंभास धरणगाव नगरपालिकेच्या लोकनियुक्त नगराध्यक्षा लीलाबाई सुरेश चौधरी, उपनगराध्यक्षा सुरेखा महाजन व विजय महाजन यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी बोलताना नगराध्यक्षा चौधरी यांनी सांगितले की, खाटू श्यामजीच्या दर्शनासाठी जाणाऱ्या भाविकांना आता धरणगाव स्थानकावरूनच थेट रेल्वे सुविधा उपलब्ध होणार आहे. त्यामुळे प्रवास अधिक सोयीस्कर व वेळेची बचत करणारा ठरेल. विशेषत: ज्येष्ठ नागरिक, महिला व कुटुंबासह प्रवास करणाऱ्यांना या सेवेचा मोठा लाभ होणार असल्याचे त्यांनी नमूद केले. या सुविधेसाठी खा. स्मिताताई वाघ यांच्या प्रयत्नांचे तसेच धरणगाव तालुका प्रवासी मंडळाच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याचे उपस्थितांनी कौतुक केले. यावेळी तालुका प्रवासी मंडळाचे अध्यक्ष महेंद्र कोठारी, सचिव एस. डब्ल्यू. पाटील, उपाध्यक्ष रवींद्र भागवत, सहसचिव किरण वाणी यांच्यासह अनेक पदाधिकारी व नागरिक उपस्थित होते. नागरिकांनी ही रेल्वे सेवा परिसरासाठी महत्त्वपूर्ण सौगात असल्याची भावना व्यक्त केली.

### सरपंच संघटनेच्या मागणीला मिळाला न्याय

प्रतिनिधी । पारोळा

तालुक्यातील ५८ ग्रामपंचायतीच्या पंचवार्षिक मुदती संपल्या आहेत. त्या ठिकाणी प्रशासक नियुक्त करावेत, अशी व्यवस्था प्रशासन करीत होते. परंतु सरपंच संघटनांनी सामूहिक रित्या शासनाच्या निदर्शनास आणून दिलेल्या मागणीनुसार सरपंचाची प्रशासक म्हणून नेमणूक केल्यास प्रशासनाचा गावाचा भविष्यात होणारा विकास या गोष्टींचा अभ्यास करून महाराष्ट्र शासनाने पुन्हा एकदा सरपंचाच्या हाती गावाची सत्तेची दोर दिली आहे.

## एरंडोल वकील संघाच्या नवीन कार्यकारिणीची निवड

प्रतिनिधी । एरंडोल

एरंडोल वकील संघाची सभा खेळीमेळीच्या वातावरणात होऊन नवीन कार्यकारिणीची दि.१२ रोजी निवड करण्यात आली. अध्यक्षपदी ॲड. अहमद सैय्यद व सचिवपदी ॲड. प्रतिभा पाटील, सहसचिव म्हणून ॲड. अजिंक्य काळे व ऑडिटरपदी ॲड. रमेश दाभाडे याप्रमाणे निवड करण्यात आली. अध्यक्षपदासाठी व सचिव आणि सहसचिवपदासाठी निवडणूक घेण्यात आली.

अध्यक्ष, सचिव व सहसचिवपदाची निवडणूक गुप्त मतदानाने घेण्यात आली. उत्साहात मतदान पार पडले. अध्यक्षपदी ॲड. अहमद सैय्यद, सचिवपदी ॲड. प्रतिभा पाटील तसेच सहसचिवपदी ॲड. अजिंक्य काळे हे निवडून आले. एरंडोल वकील संघाचे सर्व सभासद यांनी नवनियुक्त कार्यकारिणीचे अभिनंदन केले.

## डॉ. मोहम्मद रागीब उस्मान यांना पदव्युत्तर संशोधन पदवी

### सिंगापूरच्या नानयांग टेक्नोलॉजिकल युनिव्हर्सिटीने बहाल केली पदवी

प्रतिनिधी । चोपडा



महात्मा गांधी एज्युकेशन मंडळ संचलित स्मृती शारदचंद्रिका सुरेश पाटील औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय, चोपडा येथील फार्माकोग्नोसी विभागप्रमुख प्रा. डॉ. मोहम्मद रागीब मोहम्मद उस्मान यांनी नानयांग टेक्नोलॉजिकल युनिव्हर्सिटी, सिंगापूर येथून २०२५-२६ या शैक्षणिक सत्रात पदव्युत्तर संशोधन (पोस्ट-डॉक्टोरल) ही प्रतिष्ठित पदवी यशस्वीरीत्या संपादन केली आहे. ही पदवी संबंधित विद्यापीठ तसेच विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली यांच्याकडून मान्यताप्राप्त आहे. त्यांच्या संशोधननिष्ठा, परिश्रम व शैक्षणिक बांधिलकीचे हे द्योतक मानले जात आहे.

डॉ. उस्मान हे मागील १७ वर्षांपासून विभागप्रमुख म्हणून कार्यरत असून अध्यापन व संशोधन क्षेत्रात त्यांनी उल्लेखनीय योगदान दिले आहे. त्यांच्या नावावर २७ पेटंट्स नोंदलेले असून १८० हून अधिक पुस्तके, १९० संशोधन निबंध तसेच १८५ राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय परिषदांमधील सादरीकरणांचा उल्लेखनीय ठेवा आहे. ते बी. फार्म, एम. फार्म व पीएच.डी. अभ्यासक्रमांसाठी मान्यताप्राप्त मार्गदर्शक असून भारतीय औषधनिर्माण परिषदेकडील निरीक्षक म्हणूनही कार्यरत आहेत.

तसेच ते कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ यांच्या अभ्यास मंडळ व परीक्षा मंडळाचे सदस्य आहेत. त्यांच्या कार्याची दखल घेत त्यांना ३८ राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पुरस्कारांनी गौरविण्यात आले असून हू हू या आंतरराष्ट्रीय संदर्भग्रंथातही त्यांचे नाव समाविष्ट आहे. या यशानिमित्त महाविद्यालयात त्यांचा भव्य सत्कार करण्यात आला. संस्थेचे धवन रक्षा वध पदाधिकारी, प्राचार्य व प्राध्यापकवृंद यांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील संशोधन कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

## दशक्रिया विधीतून पर्यावरणाचा संदेश; माचला येथील निकम परिवाराचा स्तुत्य उपक्रम



प्रतिनिधी । चोपडा

**तालुक्यातील माचला येथील (कै.) ह.भ.प. प्रभाकर वामनराव निकम यांच्या दशक्रिया विधीच्या दिवशी निकम परिवाराने वृक्षारोपण करून पर्यावरण संवर्धनाचा प्रेरणादायी संदेश दिला.**

दशक्रिया विधीनिमित्त आयोजित कार्यक्रमात त्यांचे बंधू डॉ. रवींद्र निकम, आत्माराम निकम तसेच पुत्र नितीन व संतोष निकम यांनी सर्व धार्मिक विधी पार पाडत उपस्थितांच्या हस्ते गाव परिसरात वृक्षारोपण केले. दु:खाच्या प्रसंगीही सामाजिक बांधिलकी जपत त्यांनी स्मृतिदिन अर्थपूर्ण ठरविला. (कै.) प्रभाकर निकम यांनी आयुष्यभर वारकरी संप्रदायात राहून अध्यात्म, कीर्तन व समाजप्रबोधनाचे कार्य केले. त्यांच्या निधनाने कुटुंबीयांवर मोठा आघात झाला असला तरी त्यांच्या अपूर्ण इच्छा व समाजोपयोगी विचार पुढे नेण्याचा निर्धार निकम परिवाराने व्यक्त केला. दशक्रिया विधीलाच वृक्ष लागवड करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश देणारा हा उपक्रम उपस्थित नागरिक व नातेवाईकांसाठी प्रेरणादायी ठरला असून, त्यांच्या या निर्णयाचे सर्वत्र कौतुक होत आहे.